## आपला महाराष्ट्र

# जातीय जनगणनेत अल्पसंख्यकांचे स्थान

दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारने बहुचर्चीत जातीय जनगणनेच्या तारखा घोषित केलेल्या आहेत. विरोधी पक्षांच्या घसा कोरडा होईपर्यंतच्या मागणीवर सरकारच्या इतक्या तिखट प्रतिक्रिया होत्या की हे सरकार जातीय जनगणना करणार नाही अशी सर्वांची खात्री झाली होती. त्यातल्या त्यात काँग्रेसला जाती-जातीत आणि धर्माधर्मात फूट पाडायची आहे असे शासक पक्षाच्या गल्लीबोळातल्या भक्तांसह वरिष्ठ पातळीवर राजकारण करणाऱ्या नेत्यांनाही वाटत होते. तसे आणि तितके ते कडवट बोलत असत. पण अचानक पहलगाम हल्ल्याच्या गदारोळात सरकारने जाती आधारित गण जनगणनेची घोषणा करून सर्वांना अचंबित केले. आता तेच लोक ही घोषणा म्हणजे आगामी काळातील निवडणुकीच्या विजयावरील शिक्का मोर्तब आमच्या सरकारने केले असे म्हणत आहेत. इतके विचित्र प्रकार यापूर्वी कधीच देशवासीयांनी बघितलेले नव्हते. पण देशवासी देखील सध्या पूर्णपणे संमोहनात आहेत. आपण कशाचे समर्थन करीत आहोत ते त्यांना कळत नाही. जरी ते प्रचंड विरोधानंतर आता जाती आधारित जनगणनेचे समर्थन करीत असले आणि ती आता आमच्या विजयाची गुरुकिल्ली आहे असे म्हणत असतील तरी ते इतके सोपे मुळीच नाही. या जनगणनेचा गरीब आणि मागास अल्पसंख्यांकांवर काय परिणाम होणार आहे. याचा विचार काही तज्ञांनी केलेला आहे आणि तो लक्षात घेण्यासारखा आहे. १९३१ नंतर प्रथमच अशा प्रकारची जनगणना केली जाणार असली तरी सन २०११ मध्ये सामाजिक आर्थिक आणि जातीवर आधारित जनगणना झालेली होती. परंतु त्याचे आकडे जाहीर करण्यात आलेले नव्हते. का करण्यात आले नव्हते अजूनही काही कळले नाही. मात्र आता तशी घोषणा झाल्यानंतर ९४ वर्षानंतरच्या या घोषणेबाबत तो सामाजिक न्यायाचा निर्णय असल्याचे म्हटले जाते. त्याचप्रमाणे सत्तापक्ष आणि विरोधी पक्ष त्याच्या श्रेय वादात आता पासूनच गुंतलेला दिसतो. शासक पक्षाच्या नेत्यांच्या ज्या प्रतिक्रिया व्यक्त झालेल्या आहेत त्यानुसार मंडल आयोगाच्या शिफारशीच्या आधारावर काही अल्पसंख्याक समूहांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती लक्षात घेऊन राज्यांच्या मागासलेल्या सूचित या जातीय जनगणने च्या अंतर्गत अंतर्भाव होऊ शकतो. त्यानुसार जो मागासलेला मुस्लिम वर्ग आहे त्याला ओबीसी मध्ये सामील करण्याची शक्यता दिसते.

भारतात अल्पसंख्याक समुदायांची स्थिती फार दयनीय आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी १४.२ टक्के अल्पसंख्याकांची लोकसंख्या आहे. ती साधारणपणे १८ ते २० कोटींच्या घरात असेल. भारतात जगातील तिसऱ्या क्रमांकाची अल्पसंख्याकांची संख्या आहे. असे असले तरी तो अल्पसंख्याक मानला जातो. त्याला शिक्षण रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्व तसेच धार्मिक भेदभाव यासारख्या सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना तोंड द्यावे लागते. सांप्रदायिक हिंसा आणि सामाजिक असमानतेच्या घटना या समाजात मोठ्या प्रमाणावर दिसतात. भारतीय संविधान सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य आणि समान अधिकार प्रदान करते त्याप्रमाणेच ते अल्पसंख्याक समाजालाही प्रदान करते. त्यांनाही हा मौलिक अधिकार प्राप्त आहे. इस्लामच्या व्याख्येनुसार या समाजात जातीय भेदभावास मनाई असली तरी भारतात मात्र अल्पसंख्याकात जाती आधारीत रचना आहे. त्यानुसार या समाजाला तीन वेगवेगळ्या श्रेणीत विभागले जाते. सय्यद, शेख, पठाण, मुघल असा उच्च श्रेणीतील अल्पसंख्याक समुदाय आहे. दुसरा धर्मांतरित आणि पारंपरिक व्यवसायिक आहे. आणि एक सर्वात मागास असलेला टाकाऊ मानली जाणारी कामे करणारा वर्ग आहे. या वर्गाची व्याख्या स्पष्ट करणारा एक फारशी शब्द आहे पसमांदा या शब्दाचा वापर आपल्या सरकारचे प्रमुख नेते नेहमी करतात. त्याचा अर्थ लोकांना अजून पर्यंत कळलेला नाही. पण ते सारखे वापरत असतात. त्याचा अर्थ आहे मागासलेला वर्ग. या वर्गाचा अभ्यास करण्यासाठी सरकारने २००६ मध्ये सच्चर आयोगाची स्थापना केली होती आणि नंतर २००७ मध्ये रंगनाथ मिश्रा आयोग स्थापन केला होता. ह्या दोन्ही आयोगांनी अभ्यासांती असे म्हटले होते की अल्पसंख्याक समाजात जातींवर आधारित भेदभाव आहे. सच्चर समितीच्या अहवालानुसार सुमारे ४० टक्के अल्पसंख्याक समाज ओबीसी, तसेच एस सी, एसटी मध्ये मोडतो. त्या समाजातील काही अभ्यासक ही संख्या ७० ते ८० टक्क्यांपर्यंत असल्याचे सांगतात. त्यासाठी ते भांडत आलेले आहेत. एवढी मोठी संख्या असताना त्यांना सर्वसमावेशक अशी भागीदारी सामाजिक पातळीवर मिळत नाही. सोई सवलती मिळत नाहीत. म्हणून त्यांची मागणी अशी आहे की येत्या काळातील जातीय जनगणनेत पसमांदा अल्पसंख्याकांची गणना मागासवर्गीय श्रेणीत व्हावी. जे कारागीर आहेत, शेतमजूर आहेत, त्यांना सरकारी मदत मिळावी अशीही त्यांची मागणी आहे.

काही लोकांना शंका आहे की पसमांदा अल्पसंख्यांकांना वेगळ्या श्रेणीमध्ये दाखवून त्यांना विभाजित करण्याचे प्रयत्न होऊ शकतात. जर ही प्रक्रिया योग्य पद्धतीने हाताळली गेली नाही तर एका मोठ्या समुदायावर अन्याय होऊन तो विभाजन वादाचा बळी ठरू शकतो. काही ठिकाणी अल्पसंख्याकांचे राज्य होते. त्यांची संस्थाने होती त्यामुळे त्यांच्या संस्थानाच्या परिघात असलेल्या अल्पसंख्याक समाजांना मागासलेले म्हणणे उचित होणार नाही. कारण संस्थानांमध्ये अल्पसंख्याक समाजाची सत्ता आणि प्रभाव लक्षात घेता त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाचे मोजमाप होऊ शकत नाही. परंतु ही वस्तुस्थिती नाही. हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. खरे तर अल्पसंख्याक समाजाच्या समस्यांचे समाधान जातीवर आधारित जनगणनेत नसून गांधीजींच्या विचारानुसार त्यांच्यात शिक्षणाला प्रोत्साहन देणे, कार्यपालिका आणि कायदेमंडळात त्यांना योग्य ते स्थान देणे आणि सामाजिक ज्या काही कुप्रथा आहेत त्यांना संपविण्यात समाधान मिळू शकते. आणि तोच त्यावरचा उपाय आहे. रुढीग्रस्त परंपरा, बहुपतकीत्व, पडदा पद्धत, तलाक, महिलांचे शिक्षण रोजगार आणि संपत्ती त्यांचा वारसा हक्काप्रमाणे हिस्सा याबाबत देखील अल्पसंख्याक महानुभावांनी विचार करण्याची गरज आहे पण ते करीत नाहीत ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. सामाजिक कुप्रथा, कालबाह्य चालीरीती संपवून शिक्षणाला महत्त्व देण्याचे काम. त्या समुदायातील सुशिक्षितांनी केले पाहिजे. त्याची गरज आहे. त्यांनी प्रवाह पतीत होऊ नये. जातीय जनगणना जेव्हा सुरू होईल तेव्हा त्यांनी जागरूक राहून पसमांदा अल्पसंख्याक वर्गाला योग्य तो न्याय देण्यासाठी झटले पाहिजे. व्यवस्थित नोंद होईल असे बघितले पाहिजे. त्यासाठी काही स्वयंसेवी संस्थांनी देखील पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्याकडे दुर्लक्ष झाल्यास मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. जर डोळ्यात तेल घालून याबाबत नोंदी केल्यास मागासवर्गीय अल्पसंख्याकांचा अंतर्भाव मागास श्रेणीत होऊ शकतो. बिहार आणि तेलंगणात जातीवर आधारित जनगणना झाली असल्याने तेथील अल्पसंख्याक समूहाचे प्रमाण ७३ ते ८१ टक्क्यावर आहे. त्या आधाराचा विचार केल्यास देशभरातील अल्पसंख्याकांना न्याय मिळू शकेल अशी शक्यता नाकारता येत नाही. मात्र त्यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे.



# अल्फाबेट स्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिवस उत्साहात साजरा

**मोलगी, दि.६ (प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथील मूळबीज शैक्षणिक संस्था संचलित अल्फाबेट इंग्लिश मिडियम स्कूल व बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. यावेळी बार्टीचे तालुका समन्वयक प्रमुख पाहुणे ब्रिजलाल पाडवी होते तर अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्यध्यापक गोटूसिंग वळवी होते.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आदिवासी कुलदैवत याहामोगी मातेचे प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेचे उपमुख्याध्यापक ईश्वर वसावे यांनी केली. त्यात त्यांनी मृदा संधारण व शेती व्यवसाय वर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ब्रिजलाल पाडवी यांनी पर्यावरणीय माहितीवर मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष गोटूसिंग वळवी यांनी पर्यावरणीय समतोल काळाची गरज तसेच वृक्ष लागवडीवर प्रकाश टाकला. त्यानंतर विद्यार्थ्यांची झाडे लावा झाडे जगवा या संकल्पनेला अनुसरून जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. त्यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका मनीषा वसावे, मथुरा वसावे, शेवंती वसावे, शीतल वसावे, लक्ष्मी वसावे, हीराबाई वसावे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मनीषा वसावे तर आभार लीला पाडवी यांनी मानले.

# जिल्ह्यात हिवताप प्रतिरोध महिना राबविणार

# जिल्हा हिवताप अधिकारी पाटील यांची माहिती

**धुळे, दि.६- राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप प्रतिरोध महिना जून, २०२५ मध्ये साजरा करण्यात येत आहे. या हिवताप प्रतिरोध महिन्यात हिवताप व इतर किटकजन्य आजारांविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन या आजाराच्या प्रतिरोध उपाय योजनांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा हिवताप अधिकारी अनिल पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

हिवताप व इतर किटकजन्य आजारांविषयी जनतेचा सक्रिय सहभाग प्राप्त करुन घेण्याच्यादृष्टीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रमाद्वारे डासोत्पत्ती प्रतिबंध उपाय योजनांमध्ये लोकसहभाग वाढविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. गत वर्षी जून महिन्यात जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ही मोहिम प्रभावीपणे राबविण्यात आली. त्याचप्रमाणे यंदाही ही मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

ही मोहिम यशस्वी होण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित विभागांचे अधिकारी, आरोग्य विभागाच्या विविध शाखेतील अधिकारी, कर्मचारी तसेच विविधस्तरावरील पदाधिकारी व स्वयंसेवी संस्था याच्या सहकार्याने नागरिकास हिवताप तसेच डेंग्यू, चिकुनगुनीया, झिंका, हत्तीरोगाबाबतची कारणे, लक्षणे, उपचार, उपाययोजना, शासकीय योजनांची माहिती, हिवताप विरोधी सुधारीत औषधी योजना, सर्वेक्षण, डासोत्पत्ती नियंत्रणासाठी गप्पी माशांची उपयुक्तता, परिसर स्वच्छता, व्यक्तिगत सुरक्षेअंतर्गत मच्छरदाण्यांचा वापर, डासाच्या चाव्यापासून रक्षणासाठी विविध उपाय इत्यादी माहिती नागरिकांना देण्यात येईल.

नव्याने नेमणूक झालेल्या आशा स्वंयसेविका, आरोग्य सेवक, आरोग्य निरीक्षक यांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हिवताप विषयक ग्रामसभा, दिंड्या, प्रदर्शने, शिबिरे, इत्यादींचे आवश्यक तेथे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जून महिन्यामध्ये सुट्टीचे दिवस वगळता इतर सर्व दिवशी एक विशिष्ठ कार्यक्रम जिल्हाभरात राबविण्यात येणार आहे. असेही जिल्हा हिवताप अधिकारी श्री.पाटील यांनी कळविले आहे.

# तीन ग्रामरोजगार सेवकांवर बडतर्फीची कारवाई बेकायदेशीर : संघटना

**धुळे, दि.६- ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांना आता शासनाने आठ हजार रूपये स्थिर मानधन आणि दोन हजार रूपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर काही जणांकडून ग्रामरोजगार सेवकांच्या बाबतीत खोटया तक्रारी केल्या जात आहेत. त्यानंतर गटविकास अधिकारी हे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना विशेष ग्रामसभा घेवुन कारवाई करण्यास सांगत आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार शिंदखेडा तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींमधील ग्रामरोजगार सेवकांना बडतर्फ करण्याची कारवाई झाली आहे. ग्रामरोजगार सेवकांवर हा एका अर्थाने अन्याय आहे. खोटा तक्रारींच्या अधारे होणारी कारवाई थांबवावी, अशी मागणी ग्राम रोजगार सेवक संघटनेने केली आहे.**

शिंदखेडा तालुक्यातील वाघाडी, जोगशेलु आणि रोहाणे येथील ग्रामरोजगार सेवकांच्या विरोधात खोटया तक्रारी करण्यात आल्या आहेत. आपले सरकार या पोर्टलवर खोटया तक्रारी केल्या जात आहेत. त्यानंतर गटविकास अधिकारी ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना विशेष सभा घेवुन कार्यवाहीचा अहवाल पाठवावा, असे सांगतात. या प्रक्रीयेत ग्रामरोजगार सेवकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जात नाही. एकतर्फी विशेष सभेत बडतर्फीचा निर्णय घेतला जातो आणि तो गटविकास अधिकाऱ्यांना कळविला जातो. रोहाणे येथील प्रकाश वाघ ग्रामरोजगार सेवकासह वाघाडी येथील विनोद सनधानशिव, जोगशेलु येथील महिला ग्रामरोजगार सेवकावर विशेष ग्रामसभेत बडतर्फीचा निर्णय घेण्यात आला. ग्रामरोजगार सेवकांवर आर्थिक गैरव्यवहारांचे बनावट आरोप केले जातात. विशेष म्हणजे तक्रार करणारे गुन्हेगारी प्रवृतीचे आहेत. ते गावात दोन समाजामध्ये तेढ निर्माण करतात. विकास कामांमध्ये अडथळे निर्माण करतात. तरी देखील गटविकास अधिकारी त्यांचे चुकीचे म्हणणे लक्षात घेवुन ग्रामरोजगार सेवकांवर बडतर्फीची कारवाई करीत आहेत. प्रशासन प्रमुख म्हणुन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी ग्रामरोजगार सेवकांबाबत न्याय भुमिका घ्यावी, अशी मागणी संघटनेची आहे.




धुळे- येथील गोपीनाथ मुंडे चौक वंजार गल्ली येथे स्व.गोपीनाथराव मुंडे यांची ११ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला वंजारी समाज जिल्हाध्यक्ष संजय नाईक, रवींद्र आघाव, वंजारी युवक अध्यक्ष कमलकुमार साबळे, वाल्मिक दराडे, प्रमोद काकडे, नरेंद्र काळे, सचिन कराड, वंजारी युवक उपाध्यक्ष धनंजय आव्हाड, बापू काळे, दिनेश सांगळे, सुरेश कुटे, विनायक काकडे, सोनू गिते, वंजारी युवक मंडळाचे खजिनदार निखिल डोमाडे, सनी आघाव, सुनील चौधरी, उमेश चौधरी व वंजारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# तंबाखू विरोधी दिना निमित्त पोस्टर प्रदर्शन

**धुळे, दि.६- तंबाखूमध्ये निकोटीनसह ४ हजारा-पेक्षा जास्त विषारी रसायने असतात. तंबाखू सेवनामुळे शरीरातील रोगप्रतिकार शक्ती कमी होते. तंबाखू खाणे शरीरासाठी हानिकारक आहे. साहजिकच सर्वांनी तंबाखू पासून दूर रहावे, असे म्हणत निमगुळ येथे जनजागृती करण्यात आली. जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त निमगुळे येथे बॅनर लावुन नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात आली.**

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त धुळे शहरासह ग्रामीण भागात कार्यक्रम झाले. धुळे तालुक्यातील निमगुळ येथे सामाजिक कार्यकर्ते दिलीप खिवसरा यांनी बॅनरच्या माध्यमातुन नागरीकांमध्ये जनजागृती केली. यावेळी खिवसरा यांनी सांगितले की, तंबाखू सेवनामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो. तंबाखू सेवनाने भारतात साधारणत १५ लाख नागरीकांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनात आले आहे. तंबाखू मुळे हृदयरोग, कर्करोग, यकृताचा आजार, फुफुसाचे आजार, टीबी, यासारख्या प्राणघातक आजार उदभवतात. तंबाखू मध्ये निकोटीन असतो जो तंबाखूची सवय लावणारा मुख्य घटक असतो, निकोटीन हे विषारी रसायन असून त्या व्यतिरिक्त तंबाखूमध्ये ४ हजार पेक्षा जास्त विषारी रसायने असतात. त्यामुळे कोणीही तंबाखूचे सेवन करू नये, असेही खिवसरा यांनी सांगितले. यावेळी धर्मा सूर्यवंशी, रमेश सोनवणे, युवराज सोनवणे, रमेश मोरे, युवराज राजपूत, पुंजू मराठे, गुलाब मोरे, भिकन देसले, महादू मोरे, दिगंबर मराठे, करण सोनवणे, अर्जुन सोनवणे उपस्थित होते.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## शब्दकोडे क्रमांक : २१७८



**आडवे शब्द :** १ कैद ३.कमळ ६.धरती ८. सिंधुदूर्ग प्रांत १०.आश्रय १२.अंतर १४.काकण १६.हिंदीत-फांदी १८.ग्रामीण बोलीत-जिवंत १९.कुरुप-विरुदध २१.गोंद २२.दैना २४.अबोला २६.मुस्लिम धर्मगुरू २८.केसांत आढळणारा एक जीव २९.मादीचा जोडीदार ३१.दात ३३.मदीरा ३५.तुटलेल्या मडक्याचा तुकडा ३७.फजिती,टेर ३८.साल ३९.उपेंद्र लिमये,मुक्तता बर्वे यांचा एक सिनेमा ४१.शीतपेय भरण्याची काचेची वस्तू ४२.सोन्याची बारीक तार ४३.जहांगीर ४४.कर्ण ४५.जहाल-विरूदध ४७.नापास नसलेला ४९.मजबूत मनः स्थितीचा ५१.इंग्रजीत-नाही ५३.बारीक ५४.इच्छा ५५.पक्ष्यांचा जमाव

**उभे शब्द :** १.अक्षय कुमार,अश्विनी भावे यांचा एक सिनेमा २.कमावणारा ३.हिंदीत-पाया ४.तुंबळ युद्ध ५.नासाडी ७.गुपित ९.तलब १०.शपथ ११.लफडा १३.फालतू १५.फळाच्या आतील मगज १७.विवाह २०.चिंतन २२.लोभी २३.एक रास २५.पाऊस २६.एक अवाक्षर न उच्चारता पाळलेली शांतता २७.बालिश ३०.पतीचा भाऊ ३२.व्दारपाल ३६.आपल्या अवती-भवतीचा समाज ३८.अनारकलीचा जोडीदार ३९.ताकद ४०.वसा चालवणारा ४२.चुल पेटवण्यासाठी वापरतात ते लाकूड ४४.लोखंड घासण्याचे हत्यार ४६.गोधडी ४७.एक खनिज ४८.लपलेला ५०.मावा ५२.वारा

**शब्दकोडे क्रमांक : २१७७ चे उत्तर**


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ग | र | ता | ळा | | भ | ग | दा | ड | | स |
| ज्ञा | ड | | री | | म | ग्र | | वा | | प | त्ता |
| द | | प | ख | वा | ज | | ज | न | म | त | |
| | मा | द | | म | ल | म | | ल | | न | र |
| ग | या | | मी | न | | म | ला | | श | | क |
| ड | | अं | ग | | दा | ता | | स | र | ग | म |
| प | रा | त | | भा | व | | ना | व | | च्च | |
| | त | | ना | ना | | स | त | ल | ज | | भे |
| सु | रा | ग | | म | ग | र | | त | | दा | द |
| म | णी | | मो | ती | | ब | या | | चा | | भा |
| न | | जा | ल | | ज्ञा | त | | अ | ल | गा | व |
| | दं | गा | | ची | न | | खा | ट | | था | |







# दुचाकीस्वार जखमी

धुळे, दि.६- शिंदखेडा तालुक्यातील सुराय ते दोंडाईचा रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने समोरून येणाऱ्या दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघा-तात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.सुराय गावाकडून दोंडाईचाकडे दुचाकी क्र.एमएच १८/बीआर-६१२७ घेवून जात असतांना समोरून भरधाव वेगाने येणारे वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात फिर्यादी गंभीर जखमी झाले.







**पान १ वरुन**

## लवकरच जनतेच्या मनातले होणार

आज ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. याच दरम्यान उद्धव ठाकरे यांनी संवाद साधत मनसेसोबतच्या युतीवर भाष्य केले आहे. जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल. त्याबद्दलचे बाकीचे जे काही बारकावे आहेत ते आमचे आम्ही बघत आहोत. शिवसैनिकांच्या मनात कुठेच संभ्रम नाही. त्यांचे जे सैनिक संपर्कात आहेत, त्यांच्याही मनात संभ्रम नाही. संदेश देण्यापेक्षा लवकरच जी काही बातमी द्यायची आहे ती देऊ असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

## जलजीवन मिशनची कामे दर्जेदार

म्हणाले, जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम सुरू करण्याआधी सर्वप्रथम पाण्याचा स्रोत तपासावा, स्रोत नसलेल्या जागी योजना सुरू करण्याऐवजी स्रोत असलेल्या ठिकाणी योजनेचे नियोजन करावे. अपूर्ण योजनांबाबत योग्य मार्ग काढण्यावर भर द्यावा. कुठल्याही परिस्थितीत योजना अपयशी ठरता कामा नये. धडगाव तालुक्यात विहिरींना पाणी लागत नसल्यामुळे त्या ठिकाणी नर्मदेतून पाणी घेता येते का, त्याबाबतच्या पर्यायावर कार्यवाही करण्यात येईल. विद्युत पुरवठ्याअभावी पाण्याची योजना अपूर्ण असल्यास ती योजना नव्याने करून सोलरवर कार्यान्वित करण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. जलजीवन योजनेचा नवीन सर्वे करताना सोलरसह करण्यात यावा. नंदुरबार जिल्ह्यासाठी सरदार सरोवर प्रकल्प व उकाई धरणातून पाणी देण्याबाबत संबंधित खात्याच्या मंत्र्यांसोबत बैठक घेऊन समस्या सोडविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. जलजीवन योजनेसाठी पाणी तपासून क्षारयुक्त पाणी असल्यास त्या ठिकाणी फिल्टर प्लांटचे नियोजन करावे.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचा घेतला आढावा

यावेळी पालकमंत्री ॲड. कोकाटे यांनी स्वच्छ भारत मिशन, महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणा, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, कृषी, पशुसंवर्धन, शिक्षण, ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे, समाज कल्याण, वित्त विभाग व आरोग्य विभाग या विभागांचा तपशील-वार आढावा घेतला. दुर्गम भागात गाव वाड्यावरील अंगणवाडी मदतनीस भरती बाबत योग्य पर्याय निवडून स्थानिक महिलांची नेमणूक करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या आहेत.

## राज्यात पावसाचा जोर वाढणार

पाऊस पडणार आहे. शेतक-यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे. गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. दरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळे शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आली आहे.

## वाल्हेरी धबधब्यात युवकाचा मृत्यू

पवार, वाल्हेरीचे सरपंच, पोलीस पाटील, ग्रामस्थ व युवकांच्या नातेवाईकांनी रात्रीच्या अंधारात वाल्हेरीच्या धबधब्याच्या ठिकाणी बुडालेल्या दिगंबर या युवकाचा शोध घेतला. बॅटरीच्या सहाय्याने परिसरातपाहिले असता रात्री उशिरापर्यंत युवकाचा शोध लागला नाही. म्हणून दुसऱ्या दिवशी काल गुरुवारी सकाळी वाल्हेरीतील पोहणाऱ्या स्थानिक तरुणांनी धबधब्याच्या खोल पात्रात जावून शोध घेतला. त्याठिकाणी दिगंबर प्रदीपभाई मराठे या युवकाचा मृतदेह आढळून आल्याने बाहेर काढण्यात आले. धबधब्यातील पाण्याबुडाल्याने दिगंबर प्रदीपभाई मराठे (वय २०, रा.कुकरमुंडा) या युवकाचा मृत्यू झाला आहे. तळोदा येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून युवकाचा मृतदेह नातलगांच्या ताब्यात देण्यात आला. यावेळी कुटूंबियांनी दिगंबरचा मृतदेह पाहून हंबरडा फोडला. तसेच मयत युवकाच्या मृतदेहावर कुकरमुंडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत दिगंबर या युवकाने इंजिनिअर बनण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते, परंतु धबधब्यातील पाण्यात पोहण्याच्या मोहामुळे घडलेल्या दुर्घटनेने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे. गावातील युवकाचा मृत्यू झाल्याचे कळताच नागरीकांनी हळहळ व्यक्त केली.

## विद्यानगरीत वीज पुरवठा खंडीत

माळी आणि युवा सेनेचे हरीष माळी निवेदन दिले. वीज कंपनीच्या विद्यानगरी कार्यालयातील सहाय्यक अभियंता कुलकर्णी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात वाढत्या सौरऊर्जेच्या वापरामुळे अनेक नागरिकांनी आपल्या घरातील विद्युत भार वाढवला आहे. परिणामी, जुन्या ट्रान्सफॉर्मर्सवर अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळे, फ्रिज, एअर कंडिशनर आणि दूरचित्रवाणी संच यासारख्या अत्यावश्यक उपकरणांना कमी दाबाचा वीजपुरवठा होत आहे.

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू

अधिकारी, तलाठी, घरकुल अभियंता, रोजगार सेवक यांची आढावा बैठक झाली. यावेळी आमदार भदाणे यांनी सांगितले, तालुक्यात घरकुले मंजूर झालेल्या गावांची यादी आहे. सर्व लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. प्रशासनाने घरकुल योजनेच्या अडचणी दूर करून लाभार्थ्यांना लाभ प्राप्त करून द्या. घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू परवाने वाटप प्रक्रिया गतिमान करा, अशी सूचना यावेळी दिली. कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या मागेल त्याला फळबाग योजनेचा लाभ अधिक लाभार्थ्यांना द्यावा, असेही आवाहन यावेळी आमदार भदाणे यांनी केले.

## सहा. महसुल अधिकाऱ्यास मारहाण

**धुळ्यात महसुल अधिकारी-कर्मचाऱ्यांवर मारहाणीच्या घटना घडल्या आहेत.**

महसुल अधिकाऱ्यांवर मारहाणीच्या घटना सतत घड़त आहेत. त्यामुळे एका अर्थाने महसुल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. काही महिन्यांपुर्वी धुळे ग्रामीण तहसिल कार्यालयातील सहाय्यक महसुल अधिकाऱ्यास कार्यालयात मारहाण झाली होती. तसेच कार्यालयातील संगणकाची तोडफोड देखील करण्यात आली होती. महसुल कर्मचारी संघटनेने आक्रमक भुमिका घेतल्यानंतर त्या प्रकरणातील संशयित विक्की परदेशी याच्यावर गुन्ह्याची नोंद झाली होती. या घटनेचे अंतिमस्वरूप पुढे येत नाही तोच शुक्रवारी संध्याकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसुल अधिकरी विश्वनाथ चौधरी यांना मारहाण झाली. याबाबत महसुल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दोन तीन महिन्यांपुर्वी ॲड. आर. एस. मैंद यांनी कुळकायद्यानुसार दाखल झालेल्या दाव्याप्रकरणी महसुल दप्तरी असलेल्या कागदपत्राची मागणी केली होती. त्या कागदपत्राच्या मागणीसाठी मैंद यांच्याकडे काम करणारा प्रविणकुमार परदेशी हा सहाय्यक महसुल अधिकारी विश्वनाथ चौधरी यांच्याकडे आला. तेव्हा तुम्हांला जी नक्कल पाहिजे आहे, ते कागदपत्र असलेली नस्ती वरिष्ठ कार्यालयात गेली आहे. नस्ती आली ती तुम्हांला नक्कल मिळेल, असे चौधरी यांनी सांगितले. पण, प्रविणकुमार परदेशी याने नक्कल आताच पाहिजे, असे सांगून वाद घातला. बाहेर ये, तुला मारहाण करेल, असे सांगून निघुन गेला. घडलेला हा प्रकार चौधरी यांनी नायब तहसिलदार गोपाल पाटील यांना सांगितला. काही वेळाने ॲड. झाल्टे यांचे सहकारी विशाल पाटील हे विश्वनाथ चौधरी यांच्याकडे नक्कलेच्या कामासाठी आले. त्यांना पाहिजे असलेली नक्कल ज्या नस्तीमध्ये होती. ती नस्ती घेऊन विश्वनाथ चौधरी हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील झेरॉक्स केंद्रावर गेले. तेव्हा तेथे प्रविणकुमार परदेशी आला आणि त्याने विश्वनाथ चौधरी यांना मारहाण केली. त्यात त्यांच्या अंगावरील कपडे देखील फाडण्यात आले. या घटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयात तीव्र पडसाद उमटले. सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांना निवेदन दिले. जिल्हाधिकारी विसपुते यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर रात्री उशीराने शहर पोलिस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणून शासकीय अधिकाऱ्यास शिवीगाळ करीत मारहाण केल्याचा गुन्हा प्रविणकुमार परदेशी याच्या विरोधात दाखल करण्यात आला. याप्रकरणी भा.न्या.सं.कलम १३२, ११५ (२), १५१ (२) (३), ३५२, ३२४ (२) अन्वये गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सपोनि वर्षा पाटील करीत आहेत.

# भांडी देणारे कामगार कार्यालय इतरांसाठी डोकेदुखी, अनेकांवर उपवासमारीची वेळ

**धुळे, दि.६- शहरातील जयहिंद महाविद्यालयाजवळील कामगार अधिकारी कार्यालयआजू-बाजूच्या व्यवसायिकांसाठी डोकेदुखी झाले आहे. बांधकाम कामगारांना सध्या भांडी दिली जात आहेत. पण, भांडी वाटपाबाबत कामगार अधिकारी कार्यालयाचे कोणतेही नियोजन नाही. त्यामुळे या ठिकाणी अनेक भागातील महिला-पुरूष कामगार गर्दी करतात. एकाचवेळी किमान तीनशे कामगार येत असल्याने आजूबाजूच्या व्यवसायिकांच्या दुकानात त्यांच्या ग्राहकांना जाण्यासाठी जागा नसते. त्यामुळे सुमारे दोन वर्षांपासून व्यवसायिक त्रस्त झाले आहे. या अनावश्यक गर्दीमुळे व्यवसाय होत नाही. कुटुंबाचे पालन पोषण करायचे कसे, कर्जाची परतफेड करायची कशी, असा प्रश्न निरनिराळ्या व्यवसायिकांचा आहे.**



शासनाने बांधकाम कामगार असलेल्या महिला-पुरूषांना संसारोपयोगी भांडी मोफत देण्याची योजना आणली आहे. धुळे शहरातील जयहिंद महाविद्यालयाजवळ असलेल्या व्यापारी संकुलात कामगार अधिकारी कार्यालय आहे. या कार्यालयात भांडी घेण्यासाठी शहर आणि ग्रामीण भागातील शेकडो महिला-पुरूष सकाळी सहा पासून या ठिकाणी गर्दी करतात. भांड्यासाठी आलेल्या कामगारांची गर्दी आणि त्यांनी उभ्या केलेल्या वाहनांमुळे याच व्यापारी संकुलातील व्यवसायिकांकडे येणाऱ्या ग्राहकांना जागा मिळत नाही. परिणामी, ग्राहक दुसरी कडे जात आहेत. कामगारांची वाहने आणि महाविद्यालयाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या या मुळे या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते. परिणामी, अनेक जण या भागातून मार्गस्थ होणे टाळू लागले आहेत. या सर्व परिस्थितीचा परिणाम, या भागातील व्यापारी संकुलातील गाळे घेऊन व्यवसाय करणाऱ्यांवर झाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून या ठिकाणी पोलिस बंदोबस्तास असतात. पण, त्यांच्याकडूनही भांड्यांसाठी आलेल्या कामगारांची गर्दी नियंत्रणात येत नाही. अशीच परिस्थिती कायम राहिली तर या भागात व्यवसाय करणाऱ्यांना आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करणे तसेच व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे श्नय होणार नाही. जिल्हा प्रशासनाने याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा आणि व्यवसायिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा संजय ठाकरे या व्यावसायिकाने व्यक्त केली.



# धुळ्यातील संवेदनशील भागात संचालन जिल्हाधिकारी, पोलिस प्रमुख सहभागी

**धुळे, दि ६ : शहरासह जिल्ह्यात सात आणि आठ जूनला बकरी ईद सण साजरा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी धुळे शहरातील संवेदनशील भागात पोलिसांच्या पथकाने संचालन केले. या संचालनात जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आणि जिल्हा पोलिस प्रमुख श्रीकांत ढिवरे सहभागी झाले होते. संचलनात मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी, शिघ्रकृतीदलाचे कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेच्या वातावरणाचा संदेश जाईल, असा आत्मविश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.**

बकरीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा पोलीस दलाने शहरातील प्रमुख मार्गांवरून पथ संचालन केले. पथ संचालनाची सुरुवात चाळीसगावरोड पोलीस ठाण्यापासून करण्यात आली. चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यापासून पुढे सरळ युनिटी सर्कल, शंभर फुट रूंदीचा रस्ता या मार्गाने पथ संचालन पुढे शहरातील बसस्थानकाजवळ आले. शहर पोलीस ठाण्याजवळ संचालनाचा समारोप झाला. या संचलनात जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्यासह जिल्हा पोलिस प्रमुख श्रीकांत धिवरे, अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे तसेच शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, गृहरक्षक दलासह सुमारे ६०० ते ८०० कर्मचारी सहभागी झाले होते.

# चौघे वर्षभरासाठी जिल्ह्यातून हद्दपार आठ आरोपींना शहरात प्रवेश बंदी

**धुळे, दि.६- गोवंश जनावरांची निर्दयतेने वाहतुक करून जनावरांना कोंबून जीव जाईल अशा पध्दतीने वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या धुळ्यातील चार जणांच्या टोळक्याला पोलीस दलाने एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. तसेच अन्य आठ आरोपींवर चार दिवसांकरीता धुळे शहरात प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. या टोळीने जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा शासनाच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश केल्यास अथवा आढळून आल्यास म.पो.का.क.१४२ नुसार दोन वर्ष शिक्षा अगर दंडास पात्र राहतील.**

वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे टोळी प्रमुख जाकीर हुसैन अब्दूल मजिद तेली (वय ५१) रा.आदर्श नगर, शिरपूर जि.धुळे, टोळी सदस्य बल्लु मजीद तेली (वय ३४)रा.आदर्श नगर शिरपूर जि.धुळे, इमरान खान अय्युब खान (वय ३५)रा.कब्रस्तान जवळ शिरपूर जि.धुळे, शारूख शरीफ तेली (वय २४)रा.लोहार गल्ली, दत्त टॉकीजवळ, शिरपूर या टोळी विरूध्द शिरपूर शहर, आझाद नगर व नरडाणा पोलीस स्टेशनला विविध गुन्हे दाखल आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी म.पो.अधिनियम १९५१ चे कलम ५५ मधील तरतुदी नुसार एक वर्षाकरीता धुळे जिल्ह्यातून एक वर्षाकरीता चार जणांना तडीपार केले आहे.

गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर कत्तली करून जनावरांचे मांस विक्री करणारे नियाज अहमद अब्दूल रशिद अन्सारी (वय ५०), अबरार अहमद अब्दूल सत्तार (वय २७), मोहम्मद जुनैद मुख्तार अन्सारी (वय २८) सर्व रा.ग.नं.१४, मक्का मशिद जवळ माधवपुरा,धुळे, मो.शाबान अब्दूल हक अन्सारी (वय ४३)रा. नंदी रोड, रातराणी हॉटेल जवळ फिरदोस नगर,धुळे, मो. कलीम मुक्तार अहमद कुरैशी (वय २६) रा.सिराज पहेलवान गल्ली, मौलवी गंज,धुळे, सलमान अब्दूल मन्नान अन्सारी (वय ४०) रा.तल्हा मशिदजवळ फिरदोस नगर,धुळे, जाकीर हुसैन महेमुद अन्सारी ऊर्फ जाकीर काल्या (वय ३९)रा.ग.नं.१४ जाकीर डॉक्टर दवाखाना नाला किनारी धुळे, शेख जावेद शेख अजीज (वय ४४)रा.कुबा मशिदजवळ, आशियाना नगर, धुळे या आठ जणांविरूध्द बकरी ईद सणाचे अनुषंगाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार दि.६ जून रोजी आठ वाजेपासून ते दि.९ जून २०२५ पर्यंत धुळे शहर हद्दीत मनाई आदेश पारित करण्यात आला आहे.



धुळे- छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मनोहर टॉकीज समोर सकाळी छत्रपती शाहू महाराजांचे वंश श्रीमंत राजवर्धनजी कदमबांडे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## पाकला भारतात दंगली हव्या होत्या

पाकिस्तानने पहलगाम येथे माणुसकी आणि कश्मीरियत, या दोघांवर वार केला. त्याचा हेतू भारतात दंगली घडवण्याचा होता.

जम्मू आणि काश्मीरच्या तरुणांचा उल्लेख करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, आता तरूणांनी दहशतवादाला सडेतोड उत्तर देण्याचा निर्धार केला आहे. हा तोच दहशतवाद आहे, ज्याने खोऱ्यात शाळा जाळून टाकल्या. रुग्णालये उद्ध्वस्त केली. ज्याने अनेक पिढ्या उद्ध्वस्त केल्या. पाकिस्तानाच्या या कटाच्या विरोधात जम्मू-काश्मीरची जनता आता उभी राहिली आहे. जम्मू-काश्मीरच्या जनतेने याविरोधात जी शक्ती दाखवली आहे त्याने फक्त पाकिस्तानच नाही तर जगभरातील दहशतवाद्यांना एक कठोर संदेश मिळाला आहे.

ऑपरेशन सिंदूरचाही केला उल्लेख

पंतप्रधान नरेंद्र मोदी एक महिन्यापूर्वी ६-७ मेच्या रात्री झालेल्या ऑपरेशन सिंदूरचा देखील यावेळी उल्लेख केला. मोदी म्हणाले, आज ६ जून आहे. योगायोगाने बरोबर एक महिन्यापूर्वी आजच्या रात्री पाकिस्तानच्या दहशतवाद्यांवर मोठे संकट कोसळले होते. आता पाकिस्तानला जेव्हा कधीही ऑपरेशन सिंदूरचे नाव ऐकेल तेव्हा त्यांना त्यांचा लाजिरवाणा पराभव आठवेल. पाकिस्तानी लष्कराने आणि दहशतवाद्यांनी कधीही विचार केला नव्हता की भारत, पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांवर या प्रकारे वार करेल. अनेक वर्षांच्या मेहनतातून त्यांनी ज्या इमारती उभारल्या होत्या त्या काही मिनिटांतच ओसाड पडल्या, असेही मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिनाब आणि अंजी ब्रिजचे उद्घाटन केले. कटरा ते श्रीनगर यांच्यात चालणारी पहिल्या वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनला हिरवा झेंडा देखील दाखवला. हे प्रकल्प जम्मू आणि काश्मीरच्या पर्यटनासाठी खूपच महत्त्वाचे असल्याचे मानले जात आहे.

## फवारणीसह उपाययोजना करा

अतिसाराचे रुग्ण वाढत आहेत. त्याची कारणे काय आहेत हे तपासून त्वरित उपाययोजना कराव्यात. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हिवतापाची साथ पसरू नये, म्हणून आतापासूनच घरोघरी जाऊन फवारणी, धुरळणी करावी. साठविलेल्या पाण्यात औषधी टाकावीत. रोज किती कोणत्या भागात काम झाले, याचा अहवाल द्यावा, अशा सुचनाही त्यांनी केल्या.

## अत्याचारी देवा सोनवणे निजामपूरला गजाआड



**धुळे, दि.६- साक्री तालुक्यातील वाघापुर येथे ९ वर्षाच्या पुतणीवर अत्याचार करणाऱ्या देवा एकनाथ सोनवणे याला गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे.**

वाघापूरच्या जंगलात देवा सोनवणे लपून बसला होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. या प्रकरणी पिडीत मुलीच्या पालकांनी निजामपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. वाघापूर येथे २ जूनला नऊ वर्षाच्या बालिकेवर अत्याचार घडला. या बालिकेवर तिच्या चुलत काकाने अत्याचार केल्याचे स्पष्ट झाले. मुलीच्या पालकांनी निजामपूर पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार केली होती. घटना घडल्यानंतर अत्याचार करणारा देवा एकनाथ सोनवणे हा बेपत्ता होता. वाघापूरच्या जंगलातून निजामपूर पोलिसांनी त्याला आज गजाआड केले. या घटनेची सर्वत्र निंदा होत आहे.

## सीबीआय चौकशीची मागणी

**(पान १ वरुन)** लोकांकडून धमक्या देण्यात आल्या. या घटनेमुळे रघुवंशी समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. मारेकऱ्यांना अटक व्हावी. श्रीमती सोनम रघुवंशी यांच्या सुरक्षित परतीसाठी त्वरित आणि प्रभावी शोध सुरू करावा. सोनम रघुवंशी यांच्या शोधात सहभागी असलेल्या त्यांच्या भाऊ दीपक रघुवंशी व सहकाऱ्यांना पुरेशी सुरक्षा पुरवावी. निवेदन देण्याप्रसंगी आ.चंद्रकांत रघुवंशी, किशोर रघुवंशी, विलास रघुवंशी, निखिल रघुवंशी, रवींद्र परदेशी, पुष्पेन्द्र रघुवंशी, संदीप रघुवंशी विनोद रघुवंशी, महेंद्र रघुवंशी, संतोष परदेशी, संतोष परदेशी, सुनील रघुवंशी, शैलेंद्र रघुवंशी आदी उपस्थित होते.

**पाहिजेत**
रेडिमेड व होजिअरी दुकानात कामासाठी मुले/ मुली पाहिजेत
उषा ड्रेसेस
पारोळा रोड, गोपाल टी च्या बाजुला, धुळे

**पाहिजेत**
आमच्या ऑफिसमध्ये खालील जागा भरणे आहेत.
१) डिप्लोमा सिव्हील इंजिनिअर - २ जागा
२) डिग्री सिव्हील इंजिनिअर - १ जागा
M.S. office, Auto cad व इतर सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक आहे.
-: संपर्क :-
Ar.Raghvendra Deshpande
8805508748

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरु मुले/ मुली पाहिजेत.
मुंदडा बुक स्टॉल
मुंदडा मार्केट, पारोळारोड, धुळे

**- पाहिजेत -**
● नर्स/स्टाफ
● RMO
● Computer Operator
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**गाळा भाड्याने देणे**
ऑफिस, क्लास, गोडाऊन करिता गाळा भाड्याने देणे आहे (अ‍ॅटेच बाथरुम)
पत्ता : कोंडाजी व्यायाम शाळा, ग.नं.६, धुळे
संपर्क : नरेंद्र मोरे
9422287806

**पाहिजेत**
मुले व मुली पंप कामासाठी पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी पाहिजेत नकाणे रोड
रिया पेट्रोलियम, देवपूर, धुळे
मो.नं.८९९९२९०९९० ७२४९८१४९९०

**दुकान भाड्याने देणे**
13X65 गल्ली नं.५ किसन बत्ती चौक धुळे मधील दुकान भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
7038331394

**पाहिजेत**
पुरणपोळी करण्यासाठी कायमस्वरुपी ३ महिला लावणे आहेत.
-: संपर्क :-
9823382447
9511859761

**गाळा भाड्याने देणे आहे**
संतोष नगर, चावरा मेन रोड, वलवाडी, धुळे येथे ७०० स्क्वे.फुट चा गाळा, भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
मो.नं.९४२३९१७९७९

**बंगला भाड्याने देणे**
धुळे LIC कॉलनीमधील बंगला भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
7588517110

**पाहिजेत**
* बॅनर मशिन ऑपरेटर.
(कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक).
* ग्राफीक डिझायनर.
संपर्क
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊस शेजारी, धुळे.
Mo.8087524209

५७ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer Panasonic LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०